N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** पैठण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0367  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**25/09/2026 18:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिंनाक पासून):** 25/09/2026

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 25/09/2026

**Time From (वेळेपासून):** 12:07 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 25/09/2026  **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 25/09/2026 17:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, पैठण येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विशाल नागेशराव बहात्तरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,छत्रपती संभाजीनगर ,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,छत्रपती संभाजीनगर ,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9657718232

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री दिलीप उध्दवराव कांबळे | | | 1. टीव्ही सेंटर एन-11, सुदर्शन , साई मंदिराच्या बाजुला, छत्रपती, पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दोन 500 रुपये किंमतीच्या भारतीय चलनी नोटा व आलोसे श्री कांबळे यांचेकडील जु.वा. मोटोरोला कंपनीचा मोबा | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद                                दि. 25/09/2026

मी विशाल नागेशराव बहात्तरे, वय 47 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9657718232
दिंनाक 23/09/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक श्री. पवार, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी संपर्क करुन तक्रारदार श्री. चंद्रकांत जगन्नाथ बर्डे, वय- 68 वर्षे, व्यवसाय- शेती रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांना लाचमागणी होत असले बाबत कळविले. सदर बाबत मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांना त्याबाबत समक्ष माहिती देवुन सापळा कारवाई करण्याची परवानगी घेतली. त्यानंतर आम्ही दोन शासकीय पंच उपलब्ध करुन, सापळा पथक असे शासकीय वाहनाने लाचमागणी पडताळणी, सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या सर्व साहित्यासह छत्रपती संभाजीनगर येथून पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार श्री. चंद्रकांत बर्डे यांचेशी संपर्क करत हजर आलो. पैठण येथील गोपनिय ठिकाणी तक्रारदार श्री. चंद्रकांत बर्डे यांचा शासकिय पंच व आम्हा सर्वांचा आपसात परिचय झाला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची लाचमागणी बाबतची तक्रार तोंडी सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी तोंडी सागितलेली तक्रार पंचासमक्ष त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन घेतली, ती पुढील प्रमाणे -
" मी चंद्रकांत जगन्नाथ बर्डे, वय- 68 वर्षे, व्यवसाय- शेती रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर मो. नं. 9604202298.
दिंनाक 22/09/2026 रोजी श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना समक्ष भेटुन सांगितले की, माझ्या मालकीची शेती गट नं. 56 मौजे नायगांव शिवार ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतीमध्ये वहिवाटीचा 4 मीटर रस्त्याची नोंद 7/12 मध्ये करण्यासाठी तलाठी श्री. दिलीप कांबळे हे लाचमागणी करत असल्याबाबत सांगितले. त्यावरुन आज रोजी श्री. विशाल बहात्तरे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर हे दोन पंचासमक्ष पैठण येथील सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन त्यांचेकडे मला होत असलेल्या (पैशांची) लाचेची मागणी बाबत तक्रार देतो की,
मी वरील प्रमाणे असुन शेती व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. काही दिवसापुर्वी मी श्री. दिलीप कांबळे, तलाठी यांना सजा वडवाळी येथे भेटुन माझ्या मालकीची शेती गट नं. 56 मौजे नायगांव शिवार ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतीमध्ये वहिवाटीचा 4 मीटर रस्त्याची नोंद 7/12 मध्ये करण्याबाबत बोललो असता तलाठी श्री. कांबळे यांनी मला रस्त्याची नोंद 7/12 व करण्यासाठी 2,000/- रुपये मागणी केली होती. त्यानंतर आज पर्यंत माझे काम करुन दिलेले नाही.
मला तलाठी श्री. दिलीप कांबळे यांना माझ्या शेतातील रस्त्याची नोंद 7/12 वर करण्यासाठी पैसे देण्याची ईच्छा नसल्याने मी तुम्हाला फोन करुन बोलावले आहे.
मी आज दिंनाक रोजी 23/09/2026 रोजी माझ्या वर नमुद कामानिमित्त तलाठी श्री. दिलीप कांबळे यांना



Scanned with OKEN Scanner

भेटण्यास जाणार आहे. त्यांनी मला माझ्या शेतातील रस्त्याची नोंद 7/12 वर करण्यासाठी पैशांची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. तलाठी श्री. दिलीप कांबळे यांचेशी माझा कोणताही पैशाचा देण्याचा घेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन वैर दुष्मनी नाही. तलाठी श्री. दिलीप कांबळे यांची मी तहसिल कार्यालय,पैठण येथे भेट घ्यायला जाणार आहे. त्यावेळी मला तलाठी श्री. दिलीप कांबळे यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे पैसे मागितले व ते स्विकारले तर त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विंनती आहे."
मी वरील दिलेली तक्रार हि माझ्या स्व:हस्ताक्षरात असुन बरोबर व खरी आहे. वगैरे मजकुराची तक्रार आम्ही, दोन्ही पंच यांनी वाचुन त्यावर सहया केल्या व त्याप्रमाणे तक्रारी मधील लोकसेवक दिलीप कांबळे, तलाठी सजा वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निंणय सर्वानुमते घेण्यात आला.
त्यानंतर आम्ही दि. 23/09/2026 रोजी वर नमुद तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाईकरीता तक्रारदार व दोन्ही पंच यांना मार्गदर्शन करुन, सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये HIKVISION कंपनीचे 08 GB क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, व्हाईस रेकॉर्डरचे फोल्डरमध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्री. चंद्रकांत बर्डे व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 11.17 वा.चालु करुन, अलोसे श्री. दिलीप कांबळे यांचे मो.क्र. 9309574570 वर संपर्क केला असता त्यांनी कळविले की, माझी प्रकृती खराब आहे. तुम्ही उदया तहसिल कार्यालय, पैठण येथे भेटायला या असे सांगितले, वरुन दि. 23/09/2026 रोजी लाचमागणी पडताळणी स्थगिती संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट काढुन लाचमागणी पडताळणी स्थगिती पंचनामा करण्यात आला. त्यानंतर पुढील लाचमागणी पडताळणी पंचनामा कारवाईचे नियोजन 24/09/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यानंतर दि. 24/09/2026 रोजी वर नमुद तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाईकरीता पैठण येथील सुरक्षीत ठिकाणी तक्रारदार व दोन्ही पंच यांना मार्गदर्शन करुन, सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये HIKVISION कंपनीचे 08 GB क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, व्हाईस रेकॉर्डरचे फोल्डरमध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्री. चंद्रकांत बर्डे व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 13.36 वा.चालु करुन, तो तक्रारदार श्री.चंद्रकांत बर्डे यांचे गळयात अडकवुन तक्रारदार श्री.चंद्रकांत बर्डे व पंच नं. 01 सचिन चव्हाण यांना दिलीप कांबळे, तलाठी, सजा वडवाळी, तहसील कार्यालय पैठण यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने तहसील कार्यालय, पैठण येथे पाठविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 असे सचिन चव्हाण, तलाठी यांची भेट घेऊन, आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 14.15 वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच क्र. 1 यांना दिलीप कांबळे, तलाठी यांना तहसिल कार्यालय, पैठण येथे भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार चंद्रकांत बर्डे असे त्यांचे जु.वा.मो.सा.ने सोबत तलाठी दिलीप कांबळे, तहसील कार्यालय पैठण येथे गेलो. तेथे तक्रारदार व तलाठी दिलीप कांबळे यांची माझ्या समक्ष तहसिल कार्यालयाचे परिसरात भेट झाली. त्यानंतर तलाठी दिलीप कांबळे हे तक्रारदार यांना घेवुन तेथील जवळच असलेल्या एका चहाच्या हॉटेल जवळ आले तेथे अलोसे व तक्रारदार यांच्यामध्ये तक्रारदार यांच्या शेतातील रस्त्याची नोंद त्यांचे 7/12 मध्ये घेण्यासंदर्भाने चर्चा झाली. त्यावेळी तक्रादार चंद्रकात बर्डे यांनी त्यांचे मौजे नायगाव शिवार ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत गट नं.56 मधील चार मिटर रस्त्याची नोंद 7/12 मध्ये घेण्याची तलाठी दिलीप कांबळे यांना विंनती केली असता, तलाठी दिलीप कांबळे यांनी शेत गट नं.56 मधील चार मिटर रस्त्याची नोंद 7/12 मध्ये घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडील एक कागद घेवुन त्यावर पेनाने 1,000/- रुपये लिहुन तो कागद तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांना दाखवुन त्यांचेकडे दिला असता, तक्रारदार बर्डे हे तलाठी कांबळे यांना म्हणाले की, 1000/-रु द्यावे लागतील का ? त्यावर तलाठी दिलीप कांबळे यांनी त्यांची मान हालवुन तोंडाने बरोबर... बरोबर..हो.. म्हटले. त्यावर तक्रारदार त्यांना ठिक आहे असे म्हणाले. तलाठी दिलीप कांबळे 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचरक्कम उद्या दि. 25/09/2026 रोजी वडवाळी येथे घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांना व्हाईस रेकॉर्डर चालु झाल्यापासुन ते तलाठी यांची भेट घेऊन सुरक्षित स्थळी माघारी येईपर्यंत काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे तोंडी हकीकत सांगीतली.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील तक्रारदार चंद्रकांत बर्डे व तलाठी दिलीप कांबळे यांचेतील लाचमागणी पडताळणी दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांचेशी कांबळे तलाठी यांनी विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार हे दिलीप कांबळे तलाठी यांना म्हणाले की, " गट नं. मधील लिहुन घेणार, लिहुन देणार

Scanned with OKEN Scanner

यांची गट नं. 56 मध्ये याची फक्त आपल्याला नोंद करायची आहे.. त्यावर आलोसे म्हणाले की, मी काय करतो, गट नं. 84 चे पुर्ण मॅटर घ्यावे लागेल मला, दक्षिणेकडील बांधाने 54 कडे जाणारा रस्ता राहीलं... वेळ होईल पण काम निट होईल.. कस करता मंग.. झाल सगळं.. तर उदया देवुन टाकीन.. असे बोलुन ( तक्रारदार यांचेकडील एक कागद घेवुन त्यावर पेनाने 1,000/- रुपये लिहुन तो कागद तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांना दाखवुन त्यांचेकडे दिला असता, तक्रारदार बर्डे हे तलाठी कांबळे यांना म्हणाले की, 1000/-रु द्यावे लागतील का ? त्यावर तलाठी दिलीप कांबळे यांनी त्यांची मान हालवुन तोंडाने बरोबर... बरोबर..हो.. म्हटले. त्यावर तक्रारदार त्यांना ठिक आहे असे म्हणाले.) " असे बोलुन लोकसेवक कांबळे तलाठी यांनी तक्रारदार श्री. बर्डे यांना उद्या दि. 25/09/2026 रोजी वडवाली येथे लाचेची रक्कम घेऊन येण्याचे सांगितले. यावरुन लोकसेवक कांबळे तलाठी, सजा वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांना लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लाचेची रक्कम तक्रारदार यांना दि. 25/09/2026 रोजी आणुन देण्याचे सांगितल्याने लाचमागणी पडताळणीतील संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट काढुन लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर पुढील सापळा कारवाईचे नियोजन आज रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर आज दि. 25/09/2026 रोजी आम्ही तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा अशी 1,000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार चंद्रकांत बर्डे व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केले नंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 1,000/- रुपये तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांचे शर्टचे डाव्या बाजुचे समोरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार चंद्रकांत बर्डे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, कांबळे तलाठी, यांनी लाच रक्कम वडवाली ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्विंकारल्यानतर तक्रारदार यांनी त्यांचे गळयातील उपरणे काढुन उजव्या हातात घेण्याचा इशारा करण्याचा सुचना दिल्या.

त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये HIKVISION कंपनीचे 08 GB जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 12.07 वा चालु करुन तो तक्रारदार श्री. बर्डे यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी तक्रारदार यांचे जु.वा. मोटारसायकलवर पैठण येथील गोपनिय ठिकाणावरुन रवाना करण्यापुवी तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्र. 9404202298 वरुन अलोसे श्री. कांबळे यांना त्यांचे मो.क्र. 9309574570 वर संपर्क करुन कांबळे साहेब मी पैठण ला आलेलो आहे येवु का भेटायला असे बोलल्यावर अलोसे कांबळे यांनी तक्रारदार यांना तहसिल कार्यालय, पैठण येथे भेटण्यासाठी येण्याचे सांगितल. त्यावरुन आम्ही तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी तक्रारदार यांचे जु.वा. मोटारसायकलवर तहसिल कार्यालय, पैठण येथे जाण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी, सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथकातील सदस्य असे आमचेकडील शासकिय वाहनाने तहसिल कार्यालय, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे जावुन तक्रारदार व पंच क्र.1 हे नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 तलाठी कांबळे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे जवळ गेले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच क्र.2 व पथकातील सदस्य असे तहसिल कार्यालय, पैठण येथे कार्यालयाच्या आतमध्ये बाजुला दबा धरुन थांबलो. त्यानंतर 12.25 वा. तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांचा लाच स्विकारल्याचा इशारा म्हणुन त्यांचे गळयातील उपरणे काढुन त्यांचे उजव्या हातात घेण्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी तात्काळ आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन लगेच घटनास्थळी हजर आलो व तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्या ठिकाणी तक्रारदार व पंच क्र.1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली हे विचारले असता त्यांनी समोर साध्या कपडयातील काळया रंगाचा शर्ट घातलेला व्यक्ती तलाठी कांबळे असुन त्यांनी लाचेची रक्कम घेऊन त्यांचे अंगातील जिन्स पॅन्टच्या डाव्या बाजुच्या मागील खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी लाच स्विकारलेल्या व्यक्तीस त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव दिलीप उध्दवराव कांबळे, वय-56 वर्षे, व्यवसाय नोकरी पद ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यावेळी त्यांना आमचा सर्वांचा परिचय करुन दिला. तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांचेकडील स्विकारलेली लाचेच्या रकमेबाबत लोकसेवक दिलीप कांबळे, तलाठी यांना विचारणाकेली असता त्यांनी डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगातील नेसणीस असलेल्या जिन्स पॅन्टच्या मागील डाव्या बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी पंच क्र.2 यांचेकरवी पंच क्र.1 यांचे समक्ष लोकसेवक तलाठी दिलीप कांबळे यांचे अंगातील पॅन्टच्या डाव्या बाजुचे मागील खिशातुन लाचेची रक्कम काढुन पंच क्र.2 यांचेकडे दिलेल्या कागदातील नोटांचे नंबर पडताळुन पाहणी केली त्या नोटा लाचेच् या अॅन्थ्रॉसीन पावडरच्या मिळुन आल्या. त्यावेळी लोकसेवक तलाठी दिलीप कांबळे यांची पंचासमक्ष


Scanned with OKEN Scanner

अंगझडती घेतली असता त्यांचेकडे मोटोरोला कंपनीचा ॲन्ड्राईड मोबाईल, स्वखर्चाची 430/- रुपये रोख रक्कम मिळुन आली.
त्यानंतर तात्काळ सदर ठिकाणी लोकसेवक दिलीप कांबळे, दोन्ही पंच यांना शासकिय वाहनात बसवुन काळ्या कपडयाचे सहयाने अंधार करुन लोकसेवक दिलीप कांबळे तलाठी यांचे दोन्ही हातावर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता दिलीप कांबळे तलाठी यांचे डाव्या हाताचे तळहातावर, पाचही बोटांच्या पेऱ्यांवर ठिकठिकाणी ॲन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच दिलीप कांबळे यांचे अंगातील पॅन्टवर अल्ट्रा व्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहणी केली असता डाव्या बाजुचे मागील खिशाचे तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंच क्र.2 यांचे ताब्यातील लाचेच्या रकमेवर अल्ट्रा व्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहणी केली असता त्या पुर्ण रकमेवर ॲन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. ही बाब दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक दिलीप कांबळे तलाठी यांचे निंदशनास आणुन दिली. त्यानंतर तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांचे अंगावर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहिले असता त्यांचे उजव्या हाताचे बोटावर व तळहातावर व अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे पॅन्टचे खिशात ठिकठिकाणी ॲन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंच क्र.2 यांनी लाचेची रक्कम हाताळली असल्याने त्यांचे हाता व्यतीरिक्त इतर कोणाचेही हातावर किंवा अंगावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर घटनास्थळ रहदारीचे ठिकाण असल्याने घटनास्थळाच्या कच्या नोंदी घेऊन बाजुलाच थोडया अंतरावरील पो.स्टे. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे लोकसेवक दिलीप कांबळे, तलाठी यांना ताब्यात घेऊन आम्ही सर्व टीमसह गेलो. पो.स्टे. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांना वरील घटनेची माहीती दिली. व पुढील कामकाजासाठी कक्ष उपलब्ध करुन घेतला.
त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन सापळा कारवाईवेळी तक्रारदार व लोकसेवक दिलीप कांबळे तलाठी यांचेतील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले, त्यात तक्रारदार यांना दिलीप कांबळे तलाठी यांनी लाचमागणी झालेल्या ठिकाणी तहसिल कार्यालय, पैठण येथे येण्यास सांगितले व समक्ष भेट झाली. त्यानंतर तक्रारदार हे अलोसे दिलीप कांबळे यांना म्हणाले की, 54 मध्ये 5 बाय 4 ला पुर्व पश्चिम असा गोदावरी नदीपर्यंत 4 मीटरचा रस्ता बांधाने गट नं. 56 ला जोडलेला.. त्यावर आलोसे कांबळे म्हणाले बस..., एवढच त्यावर तक्रारदार म्हणाले हा..हां.. तुम्ही ते कागदावर लिहीलेलं देवुन टाकतो लगेच.. तुम्ही काम करा तेवढं कसं.. गरिबाच काम होतयं.. असे बोलुन तक्रारदार यांची शेती गट नं. 56 मौजे नायगांव शिवार ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतीमध्ये वहिवाटीचा 4 मीटर रस्त्याची नोंद 7/12 मध्ये करण्यासाठी 1,000/- रुपयांची लाचमागणी करुन 1,000/- रुपये स्वत: स्विकारले आहेत. त्यानंतर सापळा कारवाईचे मेमरीकार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्या संभाषणाची सविस्तर स्क्रिप्ट तयार करुन घडलेल्या सर्व घटनेचा सविस्तर सापळापुर्व/घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष तयार करण्यात येऊन सापळा कार्यवाहीची संपुर्ण प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे.
तरी दि. 25/09/2026 रोजी 12.07 वा ते 12.26 वा. दरम्यान तहसिल कार्यालय, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर याठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्री. चंद्रकांत जगन्नाथ बर्डे, वय- 68 वर्षे, व्यवसाय- शेती रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांचे शेती गट नं. 56 मौजे नायगांव शिवार ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतीमध्ये वहिवाटीचा 4 मीटर रस्त्याची नोंद 7/12 मध्ये करण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन, लाच रक्कम 1,000/- रुपये (500/- रु.दराच्या 02 भारतीय चलनी नोटा ॲन्थ्रॉसीन पावडर लावलेल्या) लाचेची रक्कम पंचासमक्ष तक्रारदार चंद्रकांत बर्डे यांचेकडुन लोकसेवक दिलीप उध्दवराव कांबळे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) सजा वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी स्वत: स्विकारली. म्हणुन अभिकथीत लोकसेवक श्री दिलीप उध्दवराव कांबळे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) सजा वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर रा. टी.व्ही. सेंटर एन-11, सुदर्शन नगर, साई मंदिराच्या बाजुला, छत्रपती संभाजीनगर यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.
माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

फिर्याद दिली सही.

Scanned with OKEN Scanner

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHADEV BABRUWAN GOMARE(I (Inspector)) / 17101005810MBGM8101I

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned with OKEN Scanner

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHADEV BABRUW/

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 17101005810MBGM81(

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन पैठण
जि.छत्रपती संभाजीनगर(ग्रा)

Scanned with OKEN Scanner